# कौटुंबिक संसाधने

## (Family Resrouces)


## डॉ. खांदाट एम.एस.

गृहशास्त्र विभाग

सौ.के.एस.के. महाविद्यालय,बीड.

## साधन संपत्तीचा अर्थ आणि व्याख्या :-

कौटुंबिक ध्येये साध्य करणे आणि गरजा भागविण्यासाठी उपलब्ध असणारी मानवीय व अमानवीय साधने म्हणजे साधन संपत्ती होय.

### साधन संपत्तीचे वर्गीकरण

**(अ) मानवी साधन संपत्ती (Human Resources)**

1. वेळ
2. शक्ती
3. आवड
4. योग्यता
5. कौशल्य
6. अभिवृत्ती

**(ब) अमानवीय साधन संपत्ती (Non -Human Resources)**

1. पैसा
2. भौतिक वस्तू
3. संपत्ती
4. सामूदायिक सोयी

**दवाखाने, आरोग्य केंद्रे, पोलीस दल, अग्नीशामक दल, मनोरंजन केंद्र, खेळ आणि क्रिडा, छंद क्रेंद, क्लब सामुदायिक केंद्रे, मोकळ्या जागा व बगीचे, शैक्षणिक संस्था, टपाल, वाहतुक सेवा, कॉम्पयुटर केंद्र, टेलिफोन सर्व्हिस इ.**

## मानवीय साधन संपत्तीचा (Human Resources) :-

मानवा जवळ असणाऱ्या व गरजा भागविण्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या साधनांना मानवीय साधन संपत्ती म्हणतात. वेळ, शक्ती, आवड, योग्यता, कौशल्य, अभिवृत्ती, ज्ञान ही साधन संपती अदृश्य स्वरुपात असल्यामुळे मानवाजवळ असून देखील तिचे महत्व चटकन लक्षात येत नाही. त्यामुळे मानवीय साधन संपत्तीकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते.

### 1. वेळ (Time) :-

वेळ ही निसर्गचक्रातील बाब असली तरी वेळेचा उपयोग करणे हे मानवाच्या कक्षेतील गोष्ट आहे. म्हणून वेळेला मानवीय आणि अमानवीय साधन संपत्ती मानणेच योग्य ठरते.

### 2. शक्ती (Energy) :-

पैसा व वेळ हयापेक्षा शक्ती हया साधन संपत्तीचे व्यवस्थापन करणे कठीण आहे. कारण वेळ प्रत्येकाजवळ सारख्या प्रमाणात उपलब्ध असतो, पैसा वाढविता येतो. परंतु शक्तीत सहजपणे वाढ करणे शक्य नसते. ही साधन संपत्ती प्रत्येकाजवळ भिन्न स्वरुपात असते.

शक्तीचे स्वरुप दोन पद्धतीत लक्षात येते.

**शारीरिक शक्ती (Physical Energy) :-**

एखादे विशिष्ट कार्य केल्यावर शक्तीचा ऱ्हास होतो. त्यामुळे व्यक्तीला थकवा जाणवतो. प्रत्येक कामासाठी शक्ती वेगवेगळ्या प्रकारे खर्च होते.

**मानसिक शक्ती (Mental Energy) :-**

सतत बौद्धीक किंवा वैचारिक कार्य करीत राहिलस मानसिक थकवा येतो आणि विचार प्रक्रिया मंदावते. अशा प्रसंगी कामात बदल केल्यास किंवा विश्रांती घेतल्यास कामाची गती चांगली राहते.

**3. अभिरुची किंवा आवड (Interest) :-**

अभिरुचीत कोणतेही काम मनापासून करण्याची ताकद असते. एखादे काम आवडीने करण्यातून अभिरुची प्रकट होते. अभिरुची ही मानवीय साधन संपत्ती आहे. विशिष्ट विषयात अभिरुची असल्यास कोणत्याही प्रकारचे काम कितीही अडथळे आले तरी चांगल्या रितीने चटकन पूर्ण केले जाते.

## 4. योग्यता (Ability) :-

मानवची साधन संपत्तीमध्ये योग्यतेचा समावेश करण्यात येतो. व्यक्तीमध्ये विशिष्ट कार्य करण्याची क्षमता असणे म्हणजे त्या क्षमतेला योग्यता असे म्हटले जाते.

## 5. कौशल्य (Skill) :-

कार्याच्या कुशलतेमधून कौशल्य प्रकट होते. कामात कौशल्य असले म्हणजे ते काम सहन रितीने पार पाडता येते. स्वयंपाक करता येणे ही योग्य तर उत्तम, स्वादिष्ट पदार्थ करुन दाखविणे हे कौशल्य.

## 6. अभिवृत्ती (Attitude) :-

वस्तू आणि व्यक्ती यांच्या संबंधात अनुकूल किंवा प्रतिकुल रीतीने वर्तन करण्याचा कल म्हणजे अभिवृत्ती होय. किंवा एखाद्या विशिष्ट घटनेसंबंधी मानातील भावना म्हणजे ज्या व्यक्तीची अभिवृत्ती होय.

## 7. ज्ञान (Knowledge) :-

एखादी वस्तू किंवा घटना यासंबंधी असलेल्या शास्त्रीय माहितीस ज्ञान असे म्हणतात. ज्ञानाला शक्ती असे म्हटले जाते. ज्ञान दोन प्रकार प्राप्त केले जाते. एक अनुभवाने व दुसरे अभ्यासाने, अनुभवामध्ये स्वत:चे आणि इतरांचे अनुभव ऐकून ज्ञान प्राप्त केले जाते.

विविध विषयाच्या अभ्यासाने ज्ञानात वाढ होते. गृहसजावटीचे शास्त्रीय अध्ययन केल्याने या विषयीचे ज्ञान प्राप्त होते.

## ब. अमानवीय साधन संपत्ती (Non-Human Resources) :-

मानवीय साधन संपत्तीपेक्षा अमानवीय साधन संपत्ती स्पष्टपणे लक्षात येते. ही साधन संपत्ती दृष्य आणि वस्तुरुप असते. त्यामुळे हया साधन संपत्तीचे महत्व चटकन कळते. अमानवीय साधन संपत्तीत पैसा, भौतिक वस्तु, संपत्ती आणि सामुदायिक सोयीचा समावेश होतो.

### 1. पैसा (Money) :-

कौटुंबिक साधन संपत्तीमध्ये पैसा ही साधन संपत्ती अतिशय महत्वपूर्ण आहे. पैशाशिवाय कुठलेही कार्य किंवा गरजा पूर्ण होणे अशक्यत असते. प्रत्येक व्यक्तीजवळ ही साधन संपत्ती कमी जास्त प्रमाणात उपलब्ध असते. प्रत्येक व्यक्तीच्या काही आवश्यक गरजा असतात, त्या योग्यरित्या पुर्ण करण्यासाठी पैशाचे व्यवस्थापन करावे लागते.

### 2. भौतिक वस्तु (Material Goods) :-

कुटूंबातील सर्व वस्तूंचा समावेश भौतिक वस्तूमध्ये करण्यात येतो. या वस्तुचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केल्या जाते.

**(i) खाद्य पदार्थ -** धान्य, डाळी, फळे, भाज्या आणि शिजवलेले पदार्थ.

**(ii) भांडी व यंत्रसामुग्री -** श्रम व वेळेची बचत करणारे उपकरणे मिक्सर, फ्रिज, कुकर, गॅस.

**(iii) कपडे -** गृहसजावट जसे पडदे, अभ्रे, चादरी, गालीचे

**(iv) फर्निचर -** कपाट, टेबल, खुर्च्या, सोफासेट ईत्यादी.

**(v) वाहने -** सायकल, स्कुटर, मोटार इत्यादी.

**(vi) स्थावर वस्तु -** घर, शेती, स्वतःचे दुकान इत्यादी.

## 3. संपत्ती  किंवा मालमत्ता (Assets) :-

i. ज्वलेरी

ii. बचत

iii. गुंतवणूक

## 4.  सामुदायिक सोयी (Community Facilities) :-

i. दवाखाने (Hospitals)

ii. आरोग्य केंद्रे (Health centers)

iii. पोलीस दल (Police force)

iv. अग्निशामक दल  (Fire Brigade)

v. मनोरंजन केंद्र (Recreation centers)

vi. खेळ आणि क्रिडा (Games and Sports)

viii. छंद केंद्र  (Hobby centers)

ix. क्लब आणि सामुदायिक केंद्रे (clubs and community centers)

x.  मोकळ्या जागा व बगीचा (Public parks & Garden)

xi. शैक्षणिक संस्था (Education Institutions)

xii. टपाल व वाहतुक सेवा  (Postal & Transport facilities)

## 4. साधन संपत्तीची वैशिष्टये (Characteristics of Resources) :-

i. साधन संपत्तीची उपयुक्तता

ii. साधन संपत्ती मर्यादित असते

iii. गणनात्मक मर्यादा

iv. गुणात्मक मर्यादा

v. साधने परस्पर संबंधीत असतात.

vi. व्यवस्थापन प्रक्रिया सर्व प्रकारच्या साधनाच्या उपयोगाकरीता लागू असते.

## 5. साधन संपत्तीच्या उपयोगावर परिणाम करणारे घटक (Factors affecting the use of resources ) :-

i. शिक्षण

ii. जीवन स्तर

iii. आर्थिक उत्पन्न

iv. निवास क्षेत्र

## 6. कौटुंबिक जीवनचक्राची अवस्था (Stages of family cycle) :-

i. प्रारंभीक अवस्था

ii. विस्तारीत अवस्था

iii. आकुंचीत अवस्था

## 7. गृहिणीचे आर्थिक सहाय्य

## (Financial Assistance of Home Maker)

# धन्यवाद !!!